पदोन्नतीच्या राखीव कोटयांतून नामनिर्देशनाने भरण्याची मंजूरी, इत्यादी विषयी संदर्भ शासनाकडे करण्यात येतात. शासनाने प्रत्यायोजित केलेल्या अधिकारासंबंधात नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ मध्ये विहित केल्यानुसार नियुक्ती प्राधिकारी / निवड मंडळ आयुक्तांच्या संमत्तीने नामनिर्देशन व पदोन्नती यांच्या प्रमाणामध्ये शिथील करण्याच्या तरतूदीही अंतर्भूत आहेत. असे असूनही याबाबतीत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येतात, ही बाब उचित नाही. त्यामुळे याबाबतीत संबंधीतांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. जिल्हा परिषदांमधील सेवाविषयक बाबीसंदर्भात शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार नियुक्ती प्राधिकारी हे कार्यवाही करण्यास सक्षम असूनही शासनाकडे त्यासंदर्भात संदर्भ करून अनाठायी कालापव्यय होतो. त्यामुळे नियुक्ती प्राधिकाऱ्याने याबाबतचे नियम / पूर्वीचे शासन आदेश यातील तरतुदींचा अभ्यास करून त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा. तसे करणे शक्य नसल्यास, त्याबाबत संबंधीत नियम/तरतूदी सुस्पष्टपणे उद्धृत करून विभागीय आयुक्तांकडे प्रथम प्रस्ताव पाठवावेत. विभागीय आयुक्तांनी त्यांचे स्तरावरच उपायुक्त (आस्थापना) इत्यादी अधिकाऱ्यांमार्फत त्याचा निपटारा करून संबंधीतांस मार्गदर्शन करावे. त्यांनी याबाबत आवश्यक तर त्यांचे स्तरावर विभाग प्रमुखांसमवेत होणाऱ्या नियतकालिक बैठकीत याचा आढावा घेवून निपटारा करावा. यापुढे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांचे प्रस्ताव विभागीय आयुक्तांच्या सविस्तर अभिप्रायासह शासनाकडे प्राप्त झाले तरच त्यांचा विचार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक -२००८०५२६११००३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्रकाश हिलेकर )
उप सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रत -

१. उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्रा.वि.व ज.सं.वि., मंत्रालय, मुं.-३२.
२. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्तांचे कार्यालय, (सर्व).
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद , (सर्व).
४. निवड नस्ती, आस्था-७ , ग्रा.वि.व ज.सं.वि., मंत्रालय, मुं.-३२.



Scanned by CamScanner

**जिल्हा परिषदेतर्फे वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक मुद्यांवर मार्गदर्शनासाठी करण्यात येणारे संदर्भ.**

***महाराष्ट्र शासन***
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांकः- जिपसे-२००६/प्र.क्र.७५३/आस्था-७,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांक - २६ मे, २००८.

**:- परिपत्रक :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ मध्ये विहित केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम,१९६७ प्रसृत करून त्यामध्ये जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सेवेच्या विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींमध्ये रजा, सेवानिवृत्ती, निवृत्ती वेतन, प्रवास भत्ता, शिक्षा इत्यादी बाबींविषयी महाराष्ट्र नागरी सेवेमधील राज्य शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना जशा लागू होतात त्याप्रमाणे त्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारासह लागू करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा परिषदांमधील "क" व "ड" गटाच्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ, जेष्ठता, पदोन्नती, सेवानिवृत्ती याबाबतही तशाच प्रकारच्या तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत व त्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी हे सक्षम आहेत. तसेच या कर्मचाऱ्यांना मानीव दिनांक देण्याबाबतचे अधिकार शासनाने विभागीय आयुक्तांना प्रदान केलेले आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम,१९६७ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ प्रसृत करण्यात आले असून त्यानुसार जिल्हा परिषदांमधील गट "क" व "ड" प्रवर्गाकरीता जिल्हा परिषदांमधील कृषी, पशुसंवर्धन, सहकार, शिक्षण, आरोग्य, लेखा, अभियांत्रिकी, समाज कल्याण अशा विविध विभागांकरिता सेवा प्रवेश तसेच शिस्त व अपील नियम विहित करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये नामनिर्देशन, पदोन्नतीबाबतही विनिर्दिष्ट अशा तरतूदी आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा नियमांबाबत वित्त विभागातर्फे वेळोवेळी अधिकाराचे प्रत्यायोजन करण्यात येते. उदा. दिनांक-०२ जून,२००३ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार रजेशिवाय अनुपस्थित राहिल्याचा पूर्ण कालावधी भूतलक्षी प्रभावाने असाधारण रजेमध्ये प्रत्यावर्तीत करण्याचे अधिकार विशिष्ट अटी पूर्ण करण्याच्या अधीन राहून नियुक्ती प्राधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. असे असूनही रजा नियमीत करण्याची प्रकरणे शासनाकडे संदर्भीत करण्यात येतात. नियुक्ती प्राधिकारी म्हणून नेमणूका दिल्यानंतर सेवाखंड क्षमापित करणे,



Scanned by CamScanner